महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# ‘नियमीत प्रसिध्दी पत्रक’
# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद.

शुक्रवार, दि.१६/१०/२०२०
वेळ: २१.००

## “मोटार वाहन कायदा अंतर्गत ७६ कारवाया- १४,४०० ₹ ‘तडजोड शुल्क प्राप्त.”

उस्मानाबाद जिल्ह्यातील महत्वाच्या रस्त्यांवर दि. १६.१०.२०२० रोजी १८ पोलीस ठाणी व उस्मानाबाद शहर वाहतुक शाखा यांनी मोटार वाहन कायदा अंतर्गत ७६ कारवाया करुन १४,४०० ₹ **‘तडजोड शुल्क’** वसुल केले आहे.

## “मारहाण.”

**पोलीस ठाणे, आंबी:** कैलास हणुमंत महानवर, रा. कंडारी, ता. परंडा यांना दि. १४.१०.२०२० रोजी १६.३० वा. सु. आरोपीच्या शेतामध्ये भाऊबंद- विशाल  विठ्ठल महानवर, कृष्णा विठ्ठल महानवर, सोमनाथ माधव महानवर, संतोष पांडूरंग महानवर, पांडूरंग माधव महानवर, प्रदिप बिरू महानवर सर्व रा.कंडारी यांनी गैर कायदयाची मंडळी जमवून शेतातील ताल फोडून पावसाचे पाणी लावण्याचे कारणावरून व पुर्वीपासून असलेल्या भांडणाचा मनात राग धरून फिर्यादीस लोखंडी गजाने व दगडाने डोकीत, गालावर,डाव्या हातावर मारून जखमी करून शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या कैलास महानवर यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३२४, ३२३, १४३,१४७,१४८,१४९,५०४, ५०६, अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## “अपघात.”

**पोलीस ठाणे, तुळजापूर:** एका अज्ञात वाहनाने दि. १५.१०.२०२० रोजी २१.०० वा.सु. ज्योतीबा बागल यांचे शेताजवळ सांगवी मार्डी शिवार येथे अविनाश दिलीप मिसाळ, वय २५ वर्ष, रा.सिंदफळ ता. तुळजापूर हा त्याचे मोटार सायकल क्र.एम.एच.२५ एए ७२१७ वर बसुन येत असताना  धडक दिली. या अपघातात तो जखमी होउन मयत झाला असुन संबंधीत अज्ञात वाहनाच्या अज्ञात चालकाने अपघातानंतर घटनास्थळावरुन वाहनासह पळ काढला. अशा मजकुराच्या सचिन सुधाकर मिसाळ यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- २७९,३०४ (अ) आणि मो.वा.का. कलम- १३४ (अ)(ब) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, तुळजापूर:** पिकप नंबर एम.एच.३४बी.जे.६७७६ चा चालक साहील सलीम शेख यांने दि. १४.१०.२०२० रोजी ०५.३० ते ०६.०० वा.सु. खंडाळा गावचे पुढे एन एच ३६१ रोडवर आपल्या ताब्यातील पिकप अतिवेगाने व निष्काळजीपणे रोडचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करून रोडवर पावसाचे पाणी असल्याने रोडचे कडेला पिकप घेत असताना पिकपवरील नियंत्रण सुटून पिकप रोडच्या बाजुच्या कठडयावर जोरात आदळुन समोर बसलेला अमोल मनोहर बुरांडे हा या अपघातात गंभीर जखमी होउन मयत झाला आहे व इतर व्यक्ती किरकोळ जखमी झाले आहेत. अशा मजकुराच्या अजय लालु रविदास, वय २२ वर्ष

रा.महाकाली कॉलनी कपिल चौक चंद्रपूर यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- २७९,३३७,३०४ (अ) आणि मो.वा.का. कलम- १८४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, तुळजापूर:** इंडीगो कार नंबर एम.एच.०२ सीएच ६६८८ चा चालक पदमाकर कुलकर्णी यांने दि. ०९.१०.२०२० रोजी १५.०० वा.सु. तुळजापूर बायपास जवळ सिंदफळ शिवारात आपली कार हायगयीने व निष्काळजीपणे भरघाव वेगात रॉग साईडने रोड क्रॉस करत असताना महींद्रा मरांझो कार क्र. एम.एच.२६ टीसी २६ ला उजवीकडील बाजूस जोराची धडक देवून यातील ४ व्यक्तींना किरकोळ व गंभीर जखमी केले. अशा मजकुराच्या धोंडीराम बालासाहेब लोमटे, वय २२ वर्ष रा. इरळद ता. गंगाखेड जि.परभणी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- २७९,३३७,३३८ आणि मो.वा.का. कलम- १८४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, भुम:** पिकप नंबर एम.एच. २५ पी ४५७९ चे चालक यांने दि. २४.०९.२०२० रोजी २१.०० वा.सु. जयवंत नगर फाटयाजवळ पिकप हायगयीने व निष्काळजीपणे भरघाव वेगात रोडचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करून फिर्यादीचे मोटार सायकलला जोराची धडक दिली. यामध्ये फिर्यादीस किरकोळ व गंभीर जखमी केले. अशा मजकुराच्या एकनाथ नारायण नागरगोजे, वय ४० वर्ष रा. जयवंत नगर ता.भुम यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- २७९,३३७,३३८ आणि मो.वा.का. कलम- १८४,१३४ (अ),(ब) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## "अफरातफर."

**पोलीस ठाणे, लोहारा:** रविंद्र दगडू भोसले रा.मातोळा ता.उमरगा यांने स्वताच्या फायदयासाठी गोदावरी अर्बन मल्टीस्टेट क्रेडीट को-ऑ सोसायटी नांदेड शाखा सास्तुर येथे प्रभारी शाखा अधिकारी पदाचा दि.०७.०९.२०२० रोजीचे १७.२० ते दि.१०.०९.२०२० रोजीचे २१५४ वा. पावेतो गैरवापर करून ९,१२,८२८ रूपयाची अफरातफर केली. अशा मजकुराच्या उमाकांती प्रकाश जंगले वय २६ वर्ष रा.सिडको नांदेड यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ४०८,५०६ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## "चोरी."

**पोलीस ठाणे, शिराढोण:** पाशा हनीफ सय्यद , रा. शिराढोण ता.कळंब यांच्या घरासमोर लावलेली हिरो होडां मोटार सायकल क्र. एम.एच.२४ यु. ६३६५ जुनी वापरती कि.अं.२०,००० रू ची दि. २१.०९.२०२० रोजी २२.०० ते दि.२२.०९.२०२० रोजीचे ०६०० वा अज्ञात चोरट्याने चोरुन नेली आहे. अशा मजकुराच्या पाशा सय्यद यांनी दि. १५.१०.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३७९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## "जुगार विरोधी कारवाई."

**पोलीस ठाणे, परंडा:** शशिकांत लहु मोराळे, वय ३० रा. तांबेवाडी ता. भुम हा दि. १५.१०.२०२० रोजी १४.३० वा.सु. तांबेवाडी चौकातील पत्र्याचे शेडमध्ये कल्याण मटका जुगार चालवण्याचे साहित्य व रोख

रक्कम ५१०,/-रु. बाळगले असतांना पो.ठा.परंडा येथील पथकास आढळले. यावरुन नमूद आरोपींविरुध्द म.जु.का. अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, लोहारा :** किशोर सुभाष सिरसे, वय ३५ रा. बेलवाडी ता. लोहारा हा दि. १५.१०.२०२० रोजी १५.४० वा.सु. बेलवाडी गावात चौकात रोडच्या कडेला कल्याण मटका जुगार चालवण्याचे साहित्य व रोख रक्कम ६३०,/-रु. बाळगले असतांना पो.ठा.लोहारा येथील पथकास आढळले. यावरुन नमूद आरोपींविरुध्द म.जु.का. अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, कळंब :** कल्याण रामेश्वर गुरसाळे, वय ५४, मंगेश विलास पाटील वय ३८ वर्ष दोघे रा. कळंब दि. १५.१०.२०२० रोजी १७.०५ वा.सु. बस स्थानक कळंब समोरील पत्रयाचे शेडमध्ये कल्याण मटका जुगार चालवण्याचे साहित्य व रोख रक्कम १५७०,/-रु. बाळगले असतांना पो.ठा.कळंब येथील पथकास आढळले. यावरुन नमूद आरोपींविरुध्द म.जु.का. अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, वाशी :** नारायण लक्ष्मण क्षिरसागर, वय ४७, रा. साठे नगर वाशी दि. १५.१०.२०२० रोजी १७.३० वा.सु. बस स्थानक वाशी येथील बंद पानटपरी समोर कल्याण मटका जुगार चालवण्याचे साहित्य व रोख रक्कम ४५०,/-रु. बाळगले असतांना पो.ठा.वाशी येथील पथकास आढळले. यावरुन नमूद आरोपींविरुध्द म.जु.का. अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, उस्मानाबाद ग्रामीण :** ज्ञानेश्वर बापुराव वाळवे, वय ४५, रा. येडशी ता.जि.उस्मानाबाद दि. १५.१०.२०२० रोजी १८.०० वा.सु. हॉटेल आनंद येडशी समोर कल्याण मटका जुगार चालवण्याचे साहित्य व रोख रक्कम ४८०,/-रु. बाळगले असतांना पो.ठा.वाशी येथील पथकास आढळले. यावरुन नमूद आरोपींविरुध्द म.जु.का. अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

## “अवैध मद्य विरोधी कारवाई.”

**पोलीस ठाणे बेंबळी:** गोरख तायाप्पा बंडगर, रा. उमरेगव्हाण ता.जि.उस्मानाबाद हा दि. १५.१०.२०२० रोजी १५.३० वा.चे.सुमारास हॉटेल महालक्ष्मी केशेगाव कारखान्याजवळ १८० मि.ली. देशी दारुच्या १९ बाटल्या (किं.अं. ९८८/-रु.) विनापरवाना बाळगला असतांना पोलीस ठाणे बेंबळीच्या पथकास आढळला. यावरुन अवैध मद्य जप्त करुन नमूद आरोपीविरुध्द म.दा.का. अंतर्गत पो.ठा. बेंबळी येथे गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे येरमाळा:** सिताराम पिराजी शिंपले, रा. बावी ता. वाशी हा दि. १५.१०.२०२० रोजी १६.२५ वा.चे.सुमारास तलाठी कार्यालय बावीच्या आडबाजूस १८० मि.ली. देशी दारुच्या १० बाटल्या (किं.अं. ८००/-रु.) विनापरवाना बाळगला असतांना पोलीस ठाणे येरमाळा येथील पथकास आढळला. यावरुन अवैध मद्य जप्त करुन नमूद आरोपीविरुध्द म.दा.का. अंतर्गत पो.ठा. येरमाळा येथे गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे लोहारा:** गोरोबा गुण्याबा सुरवसे, वय ५२ वर्ष, रा.कानेगाव ता. लोहारा हा दि. १५.१०.२०२० रोजी १४.०० वा.चे.सुमारास कानेगाव १८० मि.ली. देशी दारुच्या १२ बाटल्या (किं.अं. ८४०/-रु.) विनापरवाना बाळगला असतांना पोलीस ठाणे लोहारा येथील पथकास आढळला. यावरुन अवैध मद्य जप्त करुन नमूद आरोपीविरुध्द म.दा.का. अंतर्गत पो.ठा. लोहारा येथे गुन्हा नोंदवला आहे.
**पोलीस ठाणे ढोकी:** बप्पा मातीराम चव्हाण, रा.राजेश नगर ढोकी हा दि. १५.१०.२०२० रोजी १६.३० वा.चे.सुमारास राजेश नगर ढोकी गा.ह.भ.दारू २० लिटर (किं.अं. १०००/-रु.) विनापरवाना बाळगला असतांना पोलीस ठाणे ढोकी येथील पथकास आढळला. यावरुन अवैध मद्य जप्त करुन नमूद आरोपीविरुध्द म.दा.का. अंतर्गत पो.ठा. ढोकी येथे गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे उस्मानाबाद ग्रामीण :** कविता ज्ञानेश्वर सांळुके, रा. सारोळा ता.जि.उस्मानाबाद हा दि. १५.१०.२०२० रोजी १७.०० वा.चे.सुमारास तिच्या राहत घरासामोर सारोळा येथे गा.ह.भ.दारू ९ लिटर (किं.अं.५५०/-रु.) विनापरवाना बाळगला असतांना पोलीस ठाणे उस्मानाबाद ग्रामीण येथील पथकास आढळला. यावरुन अवैध मद्य जप्त करुन नमूद आरोपीविरुध्द म.दा.का. अंतर्गत पो.ठा. उस्मानाबाद ग्रामीण येथे गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे आंबी :** सर्जेराव भैरू डूकळे, रा. उंडेगाव हा दि. १५.१०.२०२० रोजी १८.०० वा.चे.सुमारास आरोपीच्या घराशेजारी उंडेगाव येथे गा.ह.भ.दारू ५ लिटर (किं.अं.३२५/-रु.) विनापरवाना बाळगला असतांना पोलीस ठाणे उस्मानाबाद ग्रामीण येथील पथकास आढळला. यावरुन अवैध मद्य जप्त करुन नमूद आरोपीविरुध्द म.दा.का. अंतर्गत पो.ठा. आंबी येथे गुन्हा नोंदवला आहे.

---

**जनसंपर्क विभाग, उस्मानाबाद पोलीस.**